शिधापत्रिकांबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न नागरी पुरवठा व आणि ग्राहक संरक्षण विभाग
शासन परिपत्रक क्र: संकिर्ण -२०१३/प्र.क्र.३७७/नापु २८
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १७ जुलै, २०१९

वाचा:-

१) अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन निर्णय,क्रमांक : साविव्य-१०९९/प्र.क्र.८८८६/नापु-२८,दिनांक ५.११.१९९९
२) अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन परिपत्रक,क्रमांक : साविव्य-२००९/२०४८/प्र.क्र.३३२/नापु-२८,दिनांक ११.०९.२००९
३) अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक : शिवाप्र-१४११/प्र.क्र.२५/नापु-२८,दिनांक ११.०२.२०११
४) अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.३७७/नापु-२८, दिनांक १३ जून,२०१९

प्रस्तावना :-

लेखा परिक्षण वर्ष २०१२-२०१३ संबंधात लोकलेखा समितीकडून प्राप्त झालेल्या शिफारशीच्या अनुषंगाने शिधापत्रिकांची पात्रता तपासणीच्या अनुषंगाने संदर्भाधिन शासन परिपत्रकान्वये वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत. नवीन शिधापत्रिका देताना विहीत निकषांमध्ये कुठलेही बदल करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे यासंदर्भात नागरिकां मध्ये संभ्रम राहू नये म्हणून खालील बाबी स्पष्ट करण्यात येत आहेत.

शासन परिपत्रक :-

राज्यामध्ये लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत शासनाने निश्चित केलेल्या निकषांतर्गत पात्र कुटुंबाना अनुज्ञेय शिधापत्रिका देण्यात येते. अस्तित्वात असलेल्या शिधापत्रिका धारकांच्या दुचाकी व चारचाकी वाहन तसेच जमिनीची मालकी असल्यास कुटुंबांची शिधापत्रिका रद्द करण्याचा कोणताही निर्णय शासनाने घेतलेला नाही.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत शासनाने निश्चित केलेल्या **निकषांतर्गत पात्र कुटुंबाना** देण्यात आलेल्या शिधापत्रिका व त्यानुषंगाने शिधापत्रिका धारकांना मिळणारे लाभ पुर्वीप्रमाणेच राहतील. तसेच पात्र कुटुंबांना शासनाने निश्चित केलेल्या निकषानुसार शिधापत्रिका व त्यानुषंगाने शिधापत्रिका धारकांना मिळणारे लाभ यापुढेही देण्यात येतील. दिनांक ५.११.१९९९ च्या शासन निर्णयान्वये नवीन शिधापत्रिकांसाठी निश्चित केलेल्या निकषामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. सार्वजनिक वितरण व्यवस्था (नियंत्रण) आदेश, २००१ च्या तरतुदीनुसार शिधापत्रिका तपासणी ही निरंतर प्रकीया आहे. त्यानुसार निकषात न बसणाऱ्या शिधापत्रिका तात्काळ अपात्र ठरवून त्या रद्द करण्यात याव्यात व संबधितांच्या मागणीनुसार त्यांना अन्य अनुज्ञेय शिधापत्रिका देण्याची कार्यवाही

करावी त्याचप्रमाणे दुबार, अस्तित्वात नसलेल्या व्यक्ती, मयत व्यक्ती व अपात्र शिधापत्रिकांसाठी शोध मोहिम घेऊन त्या रद्द करण्यात याव्यात.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१९०७१७१२१५३९७८०६ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANSARI HAMID HUSAIN GHULAM HUSAIN

Digitally signed by ANSARI HAMID HUSAIN GHULAM HUSAIN
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=69dd46d3e945331718a310b32442b455be9e634562551 5da42b3561e4c604e1c, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=222e51744f0136a9a645bdd866387dedb6dc52db4 58ac5087cb2226e1a239f61, ou=FOOD AND CIVIL SUPPLY DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=ANSARI HAMID HUSAIN GHULAM HUSAIN
Date: 2019.07.17 12:23:57 +05'30'

(हामिद अन्सारी)
अवर सचिव
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

प्रत,

१. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
२. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
५. मुख्य सचिव यांचे कार्यालय
६. सर्व विभागीय आयुक्त
७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय,मुंबई
८. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई
९. सर्व जिल्हाधिकारी
१०. सर्व महानगरपालिका आयुक्त,
११. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी
१२. सर्व पोलीस आयुक्त
१३. सर्व पोलीस अधिक्षक
१४. सर्व उपायुक्त (पुरवठा)
१५. सर्व अपर जिल्हाधिकारी
१४. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
१६. अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे/सोलापूर/नागपूर
१७. मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे खाजगी सचिव
१८. मा.राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे खाजगी सचिव
१९. सर्व उप सचिव/अवर सचिव/सर्व कार्यासने अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
२०. निवड नस्ती (नापु-२८).